# प्रेस नोट दि:- ०८/०१/२०२३

**मित्राचा खून करून पसार झालेल्या आरोपीस चोवीस तासाचे आत रावेत पोलीस स्टेशन चे तपास पथकाने पुनावळे येथे सापळा रचुन केली अटक.**

दि- ०३/०१/२०२३ रोजी ते दि-०४/०१/२०२३ रोजी ०९.४५ वा दरम्यान इसम नामे- राजेश शिवलिंग जाधव वय-३८ वर्ष रा. बिजली नगर चिंचवड याचा खुन झाल्याबाबत तेथील जागा मालक नामे विकास प्रकाश जाधव वय-३६ वर्ष रा. रावेत गावठाण यांनी फिर्याद दिल्यावरुन रावेत पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ०९/२०२३ भा.द.वि.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला नमुद मयत झालेले इसमाचे घटनास्थळी मोबाईल मिळुन आला नाही. तसेच मयत इसमाचा सोमनाथ सुभाष बडदाळे हा मित्र असल्याचे माहिती प्राप्त झाली. मयताचे मोबाईल आरोपी घेऊन गेला असल्याचा संशय आल्याने तांत्रीक तपासा व्दारे व आसपासचे राहणारे इसमांकडे तपास केला असता मयताचा मित्र सोमनाथ सुभाष बडदाळे याचेवर संशय आल्याने त्याचा शोध घेत असताना सायंकाळी १७.३० वा सुमारास कोयते वस्ती पुनावळे येथून आरोपी हा पायी चालत जात असताना दिसल्याने त्यास गुप्त बातमीदाराने ओळखुन तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना इशारा केला. तेव्हा त्यांनी सावध होंवून आरोपीस शिताफीने ताब्यात घेतले त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव सोमनाथ सुभाष बडदाळे वय-३८ वर्ष रा. सध्या आकुर्डी स्टेशन वर मोकळया जागेत आकुर्डी ता हवेली जि. पूणे. मुळ पत्ता –देवी नगर आळंद रोड गुलबर्गा जि-गुलबर्गा राज्य कर्नाटक असे सांगितल्याने तपास पथकाची खात्री झाली की, व त्याचे ताब्यामध्ये मयताचा मोबाईल मिळुन आल्याने रावेत पो स्टे गु.र.नं. ०९/२०२३ भा.द.वि. कलम ३०२ प्रमाणेच्या दाखल गुन्हयातील आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच सदर आरोपीकडे चौकशी केली असता आरोपी याने सदरचा गुन्हा हा आरोपी व त्याचा मित्र या दोघांमधील पुर्व वैमण्यास्यातून व दारू पिण्याच्या वादा वरुन मयत मित्रास धक्का देवुन खाली पाडुन त्याच्या डोक्यात सिमेंट चा ब्लॉक घालुन त्यास गंभीर जखमी करून त्यास संपवुन टाकण्याच्या इरादयाने खुन केला असल्याचे त्याने कबुल केल्याने त्यास ताब्यात घेवुन रावेत पोलीस स्टेशन येथे घेवुन येवून त्यास दाखल गुन्हयात दि-०५/०१/२०२३ रोजी २०.२५ वा अटक करण्यात आली आहे.

सदर कामगीरी मा. श्री. विनय कुमार चोबे पोलीस आयुक्त सो. पिं चिं शहर, मा.श्री मनोज लोहीया सह. पोलीस आयुक्त सो. पिं चिं शहर, मा.श्री संजय शिंदे अप्पर पोलीस आयुक्त सो. पिं चिं शहर, मा. श्री. काकासाहेब डोळे पोलीस उप आयुक्त सो परि-०२ पिं चिं शहर,मा. श्री पदमाकर घनवट सहाय्यक पोलीस आयुक्त सो.देहुरोड विभाग पिं चिं शहर,मा. श्री शिवाजी गवारे वपोनि सो. रावेत पोलीस ठाणे पिं चिं शहर यांच्या मार्गदर्शना खाली तपास पथकातील . श्री विशाल जाधव सपोनि सो. रावेत पोलीस ठाणे, श्री. परवेज शिकलगार सपोनि, पोहवा/४२५ कोळगे, पोहवा/४७२ तिटकरे,पोशि/१६८१ जाधव, पोशि/२३४९ राउत, पोशि/२१६० तांबे, पोशि/२४८६ ब्राम्हण, पोशि/२२२७ वाकडे, पोशि/१३०९ रणदिवे, पोशि/१६७९ देवकर यांनी केली आहे.

(काकासाहेब डोळे )
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ २,पिंपरी चिंचवड